नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ बुधवार, दि. २, एप्रिल २०२५ ■

## मास्टरमाईंड फहीमची तुरुंगात रवानगी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

महाल आणि सेंट्रल अव्हेन्यू मार्गावर गत 17 मार्च रोजी उसळलेल्या दंगलीचा कथित मास्टरमाईंड मायनॉरिटी डेमोक्रेटिक पार्टी (एमडीपी) चा शहराध्यक्ष फहीम खान याची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. आता त्याच्या जामीनावर 8 एप्रिल रोजी सुनावणी होणार आहे.

दंगलीनंतर गणेशपेठ, कोतवाली, तहसील आणि सायबर पोलिस ठाण्यांत वेगवेगळे गुन्हे नोंदविण्यात आले होते. लोकांच्या भावना भडकावून दंगल घडवून आणण्यामागे आरोपी फहीमचा हात असल्याचा दावा करण्यात आला. त्यानंतर फहीमला अटक करून त्याच्या घरावर बुलडोझरही चालविण्यात आला. सध्या तो गणेशपेठ ठाण्यात नोंद हिंसाचार प्रकरणात पोलिस कोठडीत होता. सोमवारी पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले.

### जामीनावर ८ एप्रिलला सुनावणी

न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीमध्ये तुरुंगात रवानगी केली. यासोबतच बचावपक्षाकडून जामीन अर्जही दाखल करण्यात आला. या अर्जावर 8 एप्रिल रोजी सुनावणी होईल.

फहीमसोबतच एमडीपीचा नेता हामीद इंजीनिअर याला सुद्धा दंगल भडकविण्यासाठी अटक करण्यात आली होती. तो सुद्धा कारागृहात आहे. हामीदच्या जामीन अर्जावर बुधवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी प्रकरणाच्या तपासासाठी पुन्हा आरोपींची कोठडी घेण्याचा पर्याय स्वतःकडे ठेवला आहे.

## साऊथ-ईस्ट आशियाला कनेक्टिव्हिटी वाढावी

### नितीन गडकरी

### नागपूर ते सिंगापूर, बँकॉक आणि क्वालालंपूर थेट विमानसेवेची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना नागपूरहून सिंगापूर, बँकॉक आणि क्वालालंपूर या प्रमुख आंतरराष्ट्रीय स्थळांसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची औपचारिक विनंती पत्र लिहून केली आहे. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी), नागपूर यांनी या बद्दल पाठपुरावा केल्यानंतर ही विनंती करण्यात आली आहे.



धावपट्टीच्या रिकारपेंटिंगचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर नागपूरचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ आता २४७७ कार्यरत झाले आहे. या विकासाच्या पार्श्वभूमीवर, नागपूरहून या प्रमुख आग्नेय (साऊथ - ईस्ट) आशियाई केंद्रांसाठी थेट आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू करण्याची प्रक्रिया जलद करण्यासाठी हीच योग्य वेळ आहे यावर असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी भर दिला. ही मागणी नवीन नसून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये दिल्ली येथे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी एआयडीच्या प्रतिनिधींनी नागपूरहून थेट विमानसेवा सुरू करण्याच्या गरजेवर भर दिला होता. तथापि, त्यावेळी धावपट्टीच्या पुनर्बांधणीचे काम प्रलंबित होते आणि उड्डाणांवर निर्बंध होते.

नागपूर हे एक महत्त्वाचे व्यवसाय आणि औद्योगिक केंद्र म्हणून वेगाने उदयास येत आहे. टीसीएस, पर्सिस्टंट सिस्टम्स, ग्लोबल लॉजिक, एचसीएल टेक्नॉलॉजीज, टेक महिंद्रा, एक्सेंचर, इन्फोसिस आणि इन्फोसेप्ट्स यासारख्या प्रमुख आयटी कंपन्यांनी नागपुरात आहे. अश्यात साऊथ ईस्ट आशिया, ऑस्ट्रेलिया आणि चीनसह वाढलेली हवाई कनेक्टिव्हिटी आर्थिक वाढीला चालना देईल, थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करेल आणि नवीन व्यवसाय संधी निर्माण करेल, असे काळे यांनी सांगितले.

याव्यतिरिक्त नुकतेच नागपुरात, ७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे आणि पेर्नोड रिकार्ड, अवाडा ग्रुप आणि कोरियन ग्रुप सारख्या जागतिक कंपन्यांनी विदर्भात आपले काम सुरू करत असल्याने मुंबई, दिल्ली आणि चेन्नईला देशांतर्गत कनेक्टिव्हिटी सुधारण्याची गरज देखील आहे.

या बाबी लक्षात घेता, गडकरी यांनी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाला एअर इंडिया, इंडिगो, अकासा एअर आणि आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांसह आघाडीच्या विमान कंपन्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनाही ही प्रक्रिया जलद करण्यासाठी अशीच विनंती पत्राच्या मार्फत करण्यात आली आहे. या मुद्द्यावर योग्य ती कारवाई होईपर्यन्त असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमे सतत पाठपुरावा करण्यात येईल.

## जखमीला रस्त्यावर फेकून कारचालक फरार

### हिंगण्यात उडविले, बेलतरोडीत फेकले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

हिंगणा परिसरातील नॅशनल कॅन्सर इंस्टिट्युटसमोर एका भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीचालक किरकोळ जखमी झाला तर मागे बसलेला इसम गंभीर जखमी झाला. कारचालकाने कार थांबवली आणि जखमीला रुग्णालयात पोहोचविण्यासाठी कारमध्ये बसवले. काही अंतरावर गेल्यानंतर अटक होण्याच्या भीतीने कारचालक घाबरला. त्याने चिंचभवन पुलाजवळ कार थांबवली. कारमधील जखमीला सर्व्हीस रोडच्या कडेला फेकून पसार झाला.

दरम्यान दुचाकीचालकाने पोलिसांना अपघाताबाबत माहिती दिली. मात्र, जखमी युवक मेडिकल, मेयो यासह जवळपासच्या कोणत्याच रुग्णालयात दाखल नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे बेलतरोडी, हिंगणा, वाहतूक पोलिस आणि आर्थिक गुन्हे शाखा पोलिसांनी जखमी युवकासाठी शोधमोहीम राबविली. पहाटे 3 वाजता चिंचभवन पुलाखाली त्या युवकाचा मृतदेह सापडला. त्या युवकाला वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी हिंगणा पोलिसांनी रूपेश वाकडेच्या तक्रारीवरून अपघाताचा तर बेलतरोडी पोलिसांनी मृत्यूची नोंद केली. कृष्णा बोरसे (45) रा. अयोध्यानगर, हुडकेश्वर असे मृताचे नाव आहे.

आदिवासीनगर येथील रहिवासी रूपेश वाकळे आणि त्याचा मित्र कृष्णा दोघेही बांधकाम मिस्त्री आहेत. हिंगणाच्या गुमगाव परिसरात त्यांचे काम सुरू आहे. दोघेही एकाच ठिकाणी कामाला असल्याने एकाच दुचाकीने जायचे. सोमवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास काम आटोपून दोघेही घरी जाण्यासाठी निघाले. रूपेश गाडी चालवत होता, तर कृष्णा मागे बसला होता. कॅन्सर इन्स्टिट्यूटकडून जात असताना समोर गतिरोधक आल्याने रूपेशने ब्रेक लावला. त्यामुळे मागे बसलेला कृष्णा गाडीवरून उसळत खाली पडला. त्याच वेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या कारचालकाने कृष्णाला जबर धडक दिली आणि काही दूरपर्यंत फरफटत नेले. कृष्णा गंभीर जखमी झाला. रूपेश मित्राच्या मदतीला धावला. तेवढ्यात कारचालकही मदतीला आला. जवळच पाईप टाकण्याचे काम सुरू होते. तेथील मजूरही मदतीला धावले. त्यांनी जखमी कृष्णाला उचलून कारमध्ये ठेवले. या प्रकरणी हिंगणा पोलिसांनी अपघाताची नोंद केली, तर बेलतरोडी पोलिसांनी मृत्यूची नोंद केली आहे. वपोनि वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद कवाडे यांच्या उपस्थितीत बेलतरोडी पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. फॉरेन्सिक चमूला पाचारण करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने कारचालकाचा शोध सुरू आहे.

### कारच्या पाठीमागे रूपेशची दुचाकी

कारचालक जखमीला रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी निघाला. कारच्या मागे रूपेश दुचाकीने होता. मात्र, काही दूर अंतरावर गेल्यानंतर कारचालक दिसलाच नाही. त्यामुळे रूपेश घाबरला. त्याने काही वेळ शोध घेतला. नंतर एम्स, मेयो आणि मेडिकल रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. मात्र, तिथे जखमीला आणले नसल्याचे सांगण्यात आले. सर्वत्र शोध घेत असताना रात्री 12.30 वाजता त्याला अजनी वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक रितेश अहेर दिसले. रूपेशने त्यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती दिली.

### बेलतरोडीच्या पथकाला सापडला मृतदेह

दरम्यान बेलतरोडी ठाण्याचे पोलिस शिपाई रितेश कारेमोरे आणि पोलिस शिपाई गजभिये हे परिसरात गस्त घालत होते. पहाटे 3 वाजताच्या सुमारास चिंचभवन पुलाखाली असलेल्या सर्व्हिस रोडजवळ त्यांना एक मृतदेह आढळला. त्यांनी लगेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक कवाडे यांना माहिती दिली. कवाडे यांच्यासह हिंगणाचे पोलिस निरीक्षक जितेंद्र बोबडे, पोलिस निरीक्षक रितेश अहेर, आर्थिक गुन्हे शाखेचे विनोद गोडबोले घटनास्थळी पोहोचले. कृष्णाचा मित्र रूपेशला घटनास्थळी नेले असता त्याने कृष्णाची ओळख पटविली.

## हैदोस घालताना गुंडाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

शस्त्राच्या बळावर परिसरात हैदोस घालणाऱ्या एका गुंडास इमामवाडा पोलिसांनी अटक केली. राहुल उर्फ सोनू भीमराव म्हैसकर (40) रा. जाटतरोडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

सोमवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास इमामवाडा ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान जाटतरोडीतील शिव भोजनालयाजवळ एक गुंड शस्त्राच्या बळावर हैदोस घालत आहे. रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांना धमकावत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस घटनास्थळी पोहोचले असता सोनूने तेथून पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट आणि मनाई आदेशाचे उल्लंघनाचा गुन्हा नोंदवून अटक केली.

## उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानिर्मिती सज्ज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढते, यासाठी दरवर्षी महानिर्मितीतर्फे सूक्ष्म नियोजन करण्यात येते. सद्य स्थितीत राज्याची विजेची एकूण मागणी २९,५०० मेगावॅटच्या घरात पोहोचली असून यासाठी महानिर्मिती सज्ज आहे.

महानिर्मितीने मार्च २०२५ मध्ये मासिक औष्णिक महत्तम ५,३२८ दशलक्ष युनिट्स इतके विक्रमी वीज उत्पादन केले तर उरण वायू वीज केंद्राने मागील ५ वर्षांतील २,४७३ दशलक्ष युनिट्स वीज उत्पादन केले आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सन २०२४-२५ मध्ये निर्धारित केलेल्या लक्ष्यास अनुसरून महानिर्मितीच्या अपारंपारिक ऊर्जा, पुणे मंडळाने ४५४.४० दशलक्ष युनिट्स वीज उत्पादनाचे लक्ष्य गाठले आहे. एकूणच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६१,४५६ दशलक्ष युनिट्स इतकी विक्रमी वीजनिर्मिती झाली असून सन २०२३-२४ चा ६१,४३९ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मितीचा विक्रम तोडला आहे, हे विशेष. महानिर्मितीने सातत्याने उच्चतम कामगिरी नोंदवत अनेक उच्चांक गाठले आहेत. औष्णिक संचांची उपलब्धता, आवश्यक देखभाल-दुरुस्ती, भांडवली स्वरूपाची कामे याकडे विशेष भर दिल्याने यावर्षी महानिर्मितीच्या १५ संचांतून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन झालेले आहे. वीज उत्पादनासाठी सुमारे २२.५ लक्ष मेट्रिक टन इतका कोळसा साठा सद्य परिस्थितीत उपलब्ध आहे. कोळसा मंत्रालय, कोळसा कंपन्या आणि रेल्वे प्रशासनासोबत समन्वय सुरु आहे. वीज उत्पादनासाठी आवश्यक जल साठा संबंधित धरणांमध्ये पुरेसा उपलब्ध असल्याने आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर जनतेला आवश्यक मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन करण्यासाठी महानिर्मिती प्रयत्नशील आहे.

## जुन्या वादातून ठार मारण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

घरासमोर उभा राहून शिविगाळ करणाऱ्या आरोपीस हटकणे एका व्यक्तीला अंगलट आले. आरोपीने ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यावर कुऱ्हाडीने मारून गंभीर जखमी केले. ही थरारक घटना मानकापूर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी जखमी रूपेश विनोद चंदनकर (39) रा. ताजनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपीला अटक केली आहे. राजू सुखदेव धुर्वे (23) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आरोपी राजू हा पोलिस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. जखमी रूपेश हा त्याच्याच वस्तीत राहतो. शनिवारी काही कारणातून राजूने रूपेशच्या आईशी वाद घातला होता. या दरम्यान त्याने त्यांना जबर मारहाणही केली होती. याची तक्रार पोलिसात करण्यात आली होती. त्यामुळे राजू चिडलेला होता. त्याचा वचपा काढण्यासाठी रविवारी सकाळी 11 वाजताच्या सुमारास तो रूपेशच्या घरासमोर येऊन शिविगाळ करू लागला. रूपेशने त्याला विरोध करीत शिविगाळ करण्यास मनाई केली.

यावरून राजू आणखी चिडला. त्याने कुऱ्हाड आणून रूपेशच्या डोक्यावर वार करीत गंभीर जखमी केले. रूपेशच्या डोक्यातून रक्ताची धार लागताच आरोपी पळून गेला. घटनेची माहिती मिळताच मानकापूर पोलिस घटनास्थळी पोहोचले. रूपेशला उपचारार्थ रुग्णालयात रवाना करण्यात आले. रूपेशच्या जबानीवरून आरोपी राजूविरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. पुढील तपास सुरू आहे.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर नऊ सदस्य निवडीसाठी मतदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर 9 सदस्य निवडण्यासाठी निर्वाचन अधिकारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांनी 17 जानेवारी 2025 अन्वये निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर 9 सदस्य निवडण्यासाठी होस्टेल क्र. 3, अधिष्ठाता यांचे कार्यालया जवळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या ठिकाणी नागपूर जिल्हयातील मतदारांसाठी 16 मतदान केंद्र उभारण्यात आलेले आहेत. एकूण मतदार 7 हजार 670 (पुरुष- 3941, महिला- 3 हजार 729) आहेत. दिनांक ३ एप्रिल रोजी सकाळी 8 ते सायं. 5 यावेळेत मतदान घेण्यात येणार असून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या निवडणुकीत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत असलेले वैद्यकीय व्यवसाय करणारे व मतदार यादीमध्ये नोंदणी केलेले मतदार मतदानास पात्र आहेत. मतदारांना मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर ओळख पटवण्यासाठी खालीलपैकी एक छायाचित्र असलेले ओळखपत्र दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिलेले ओळखपत्र, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिलेले नोंदणीपत्र (छायाचित्र असलेले), भारत निवडणूक आयोगाने दिलेले मतदार फोटो ओळखपत्र , आधार कार्ड, बँक / टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्र असलेले पासबुक, वाहनचालक परवाना, स्थायी खाते क्रमांक (पॅन कार्ड), भारतीय पारपत्र (पासपोर्ट), छायाचित्र असलेली निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे, केंद्र सरकार / राज्य शासन / सार्वजनिक क्षेत्र उपक्रम / सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचा-यांना दिलेले छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद सदस्य / विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र, विशिष्ट दिव्यांगत्वाचे ओळखपत्र (यूडीआयडी), सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार. वरील प्रमाणे नमूद बाबींपैकी कोणताही एक पुरावा मतदारांनी आपली ओळख पटविण्यासाठी मतदान केंद्रांवर दाखविल्यास त्यांना मतदानाचा मतदान करता येईल.

## घरात घुसून १.६१ लाखांची चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

झोपण्यापूर्वी स्वयंपाक खोलीचे दार बंद करणे एका महिलेला चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने घरात प्रवेश करून कपाटातील 1 लाख 61 हजार रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरून नेले. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी शिफू प्रेमप्रकाश यादव (32) रा. काचोरे पाटीलनगर, चिचभवनच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

शनिवारी रात्री 9.30 वाजताच्या सुमारास शिफू जेवण करून कुटुंबासह झोपायला गेल्या. झोपण्यापूर्वी स्वयंपाक खोलीचे दार बंद करणे त्या विसरल्या. हिच संधी चोराने साधली. मध्यरात्रीला स्वयंपाक खोलीच्या दारातून त्याने घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचांदीचे दागिने व पॅन कार्ड असा एकूण 1,61,200 रुपयांचा माल चोरून पसार झाला. रात्री 2 वाजताच्या सुमारास शिफू यांची झोप उघडली. त्यांना कपाटाचे दार उघडे दिसले. त्यातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडून होते. त्यांनी लॉकरमधील दागिने तपासले असता ते गायब होते. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली.

## अस्तिका समाजाच्यातर्फे रामनवमी उत्सवाचे २६ वे वर्ष

## ६ एप्रिल रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

अस्तिका समाज नागपूरच्या वतीने आपला २६ वा रामनवमी उत्सव शुक्रवार, ४ ते ६ एप्रिल या दरम्यान श्री भगवती सभागृह, श्री गजानन महाराज मंदिरासमोर, त्रिमूर्ती नगर येथे साजरा करणार आहे. हा कार्यक्रम ४ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजता गणपती हवन आणि नवग्रह हवनाने होईल, त्यानंतर दीपपूजा होईल. ज्यामध्ये सुहासिनी सहभागी होतील.

सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, सोसायटीने "अखंड ललिता सहस्त्र नाम पारायण" आयोजित केले आहे. जे नागपूरात प्रथमच होत आहे आणि या वर्षीच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण आहे. या "अखंड ललिता सहस्त्र नाम पारायण" च्या आयोजनासाठी, समाजाने देवी मातेच्या भक्तांना आणि विदभार्तील विविध भागातील सर्व धार्मिक संघटनांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याची विनंती करून आवाहन केले आहे. मराठी संप्रदाय भजनाला प्रोत्साहन देण्यासाठी, समाजाने आनंद देशमुख आणि आनंद किटकरू यांच्या नेतृत्वात श्री साई दत्त प्रासादिक भजन मंडळी नागपूर ला संध्याकाळी ६.३० वाजता 'अवघा रंगा एक झाला या पारंपारिक मराठी अभंग गीताची मूळ मराठी आवृत्ती सादर करणार आहेत.

कार्यक्रम शनिवारी ५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता भगवान श्री रामाच्या सहस्त्रनाम अर्चनेने होईल. त्यानंतर श्री जयदेवर अष्टपती यांचे पंथीय भजन होईल.

संध्याकाळी भगवान आणि माता सीतादेवी यांचे दिव्यनाम संकीर्तन केले जाईल आणि रात्री उशिरापर्यंत ढोल उत्सव केला जाईल. रविवारी ६ एप्रिल रोजी, रामनवमीच्या दिवशी, सकाळी ८.३० वाजता उंचवृद्धि (भागवत भिक्षा) कार्यक्रमाची सुरुवात होईल, त्यानंतर दक्षिण भारतीय संप्रदाय भजन शैलीत सीता राम कल्याणम सादर होईल. चेन्नई येथील लोकप्रिय तरुण आणि भक्त आदित्य रमेश आणि त्यांची टीम दोन दिवसांच्या भगवान राम सीता विवाह कार्यक्रमाचे आयोजन करतील. त्यांना मृदंगावर कृष्ण प्रसाद, ढोलकी वर श्रीनिवासन, हार्मोनियमवर सुजन, गायनावर श्रीनिधी आदित्य आणि बालसुब्रमण्यम साथ करतील. सोसायटीने अभिनय चक्रवर्ती रमेश बागवदार यांना दोन्ही दिवशी अभिनय आणि उदात्तीकरणासाठी आमंत्रित केले आहे.

या कार्यक्रमात विविध धार्मिक संस्थांमध्ये सेवा दिलेल्या समाजातील ज्येष्ठ नागरिकांना सन्मानित केले जाईल. दुपारी १.३० वाजता हनुमान उत्सव आणि महाआरतीने कार्यक्रमाची सांगता होईल आणि त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल. भगवान श्री रामचंद्रमूर्तींचे अपार आशीर्वाद प्राप्त करण्याचे आवाहन के व्ही नागराजन मानद सचिव अस्तिक समाज नागपूर द्वारे केले जात आहे.

## प्रयोगशाळा प्रशिक्षण प्रवेश परीक्षा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरी (पीआरएसएसई) ने प्रयोगशाळा प्रशिक्षण कार्यक्रमासाठीची प्रवेश परीक्षा तारकुंडे धरमपेठ हायस्कूल येथील प्रो. राजेंद्र सिंग सायन्स एक्सप्लोरेटरी येथे बुधवार, 2 एप्रिल 2025 रोजी आयोजित करण्यात आली आहे. पाचवी, सहावी व सातव्या वर्गातील विद्यार्थ्यांना या परीक्षेत सहभागी होता येणार आहे. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र, गणित आणि डिझाइन थिंकिंगमधील विविध प्रयोगांच्या माध्यमातून वैज्ञानिक उत्सुकता वृद्धींगत करण्यासाठी हे प्रशिक्षण आयोजित केले जाते. या उपक्रमात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये प्रत्यक्ष शिक्षण दिले जाते.

## अति आधुनिक जीवनशैलीमुळे स्वमग्न मुलांमध्ये चिंतनिय वाढ

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. १ :

आहार, विहार आणि विचार यांच्यातील अतिआधुनिक असमन्वयामुळे जन्माला आलेल्या बाळांमध्ये पंधरा ते अठरा महिन्यापासून स्वमग्नतेची लक्षणे दिसून येतात. असंयुक्त कुटुंब पद्धती, अति आधुनिक जीवनशैली व असामाजिकरण यामुळे होणाऱ्या सर्वांगीण पोषक वातावरणाच्या अभावामुळे स्वमग्न मुलांमध्ये चिंतनीय वाढ होत आहे.

स्वमग्नता हा आजार नसून न्यूरोलॉजिकल डीसऑर्डर आहे. मुलांतील वर्तणुकीच्या अभावामुळे यास ऑटिझम स्पेक्ट्रम डीसऑर्डर असेही म्हणतात. यास कोणतीही गर्भावस्थेतील किंवा प्रसूतीपूर्व घटना कारणीभूत नाही. स्वमग्नता हा कोणत्याही मधुमेही, हायपर टेन्शनच्या रुग्णाप्रमाणे विविध कारणांच्या समूहामुळे होणारी जन्मस्थ अवस्था आहे. योग्य उपचार, योग्य थेरपी व योग्य सामाजीकरण यांच्यातून पूर्णपणे हा आजार बरा होऊ शकतो. पालकांना आपले मूल स्वमग्न आहे हे ओळखता यायला पाहिजे. ही मुले 15 महिन्यापर्यंत सामान्य असतात पण नंतर त्यांच्या मेंदूमध्ये रिवर्स डॅमेज दिसून येतो. यामुळे अशी मुले स्वतःतच गर्क असतात. नजरेला नजर देत नाहीत. दिलेल्या सूचनांचे पालन करत नाहीत. एकच गोष्ट वारंवार करतात किंवा एकाच गोष्टीकडे टक लावून बघतात. स्पर्श, प्रकाश, आवाज यांचा त्यांना त्रास होतो.

ही मुले स्वतःच्या संवेदना प्रकट करू शकत नाही व दुसऱ्यांच्या संवेदनाही समजू शकत नाही त्यामुळे या मुलांचे सामाजीकरण होत नाही. हा त्यांच्यातील एक मोठा विजातीय घटक आहेज्यामुळे ही मुले इतर मुलांपासून वेगळी पडतात. अशा मुलांना दोन वर्षाच्या आत चाइल्ड न्यूरोलॉजिस्ट कडून योग्य उपचार, योग्य थेरपी व सोबतच सामाजिक तत्त्वयुक्त वातावरण दिले तर ही मुले पूर्णतः बरी होतात.

या मुलांची तीन फेजेस आहेत. माईंड मॉडरेट आणि सीवीअर. सीव्हीअर डिसऑर्डर असलेली मुले पूर्णतः बरी होऊ शकत नाही पण माइल्ड डिसऑर्डर असणारी मुले वेळेत केलेले निदान व उपचारामुळे पूर्णतः बरी होऊ शकतात. वैद्यकीय दृष्ट्या या मुलांचे बारा डोमेन आहेत ज्यामध्ये ग्रास मोटर, फाईन मोटर, सोशलाईझेशन, कम्युनिकेशन, व्हिजन को-ऑर्डिनेशन आणि स्पीच यांचा अंतर्भाव होतो.

या बाळाच्या विकास प्रक्रिया त्या त्या वयात होत आहे की नाही हे चाइल्ड न्यूरोलॉजिस्ट बघतात आणि प्रत्येक मुलाच्या वर्तणुकीनुसार प्रत्येकाला उपचार दिले जातात.



योग्य वेळेत निदान आणि मेडिसिन व ऑक्युपेशनल थेरपी यांच्या समन्वयातून स्वमग्न मुले नॉर्मल मुलांच्या जवळ जाऊ शकतात. आजची प्रचलित आधुनिक जीवनशैली व असयुक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांमध्ये स्वमग्नतेचे प्रमाण वाढत आहे जी चिंतेची बाब आहे. पालकांनी अशा मुलांचा प्रथमतः स्वीकार केला पाहिजे जेणेकरून त्यांच्या उपचारात बिलंब होणार नाही.

**डॉक्टर नीलम जैन**
लाईफ लाईन फिजिओथेरपी अँड चाइल्ड रिहॅबिटेशन सेंटरच्या संचालिका

गर्भधारणा व प्रसुती संबंधी घटनांचा स्वमग्नता या सिंड्रोमशी काहीही संबंध नसून बाळ जन्माला आल्यानंतर त्यांना मिळणाऱ्या अयोग्य आहार, विहार, विचार व असामाजिक जीवनशैलीमुळे भारतामध्ये शंभर पैकी पाच मुले स्वमग्नतेची आढळून येतात. या मुलांमध्ये बुद्धिमत्ता तर असतेच पण सामाजिकीकरणासाठी लागणारा समजूतदारपणा नसतो. वेळीच निदान, उपचार व थेरपीतून स्वमग्नतेची मुले बरी होऊ शकतात. स्वमग्न मुले इंटेलेक्च्युअल जॉब्स मध्ये जास्त ॲक्टिव्ह असतात.

**डॉ. विनीत वानखेडे**
चाइल्ड न्यूरोलॉजिस्ट

योग्य उपचारासोबतच ऑक्युपेशनल थेरपी दिल्या जाते. यामध्ये सेंसरी इंटिग्रेशन थेरपी, रेगुलर ऑक्युपेशनल थेरपी आणि स्पीच थेरपी दिल्या जाते.

सेन्सरी इंटिग्रेशन थेरपीमध्ये ऐकणे, बघणे, स्पर्श,वास आणि चव या सोबतच दाब आणि ॲक्टिव्हिटी या संवेदनांवर काम करून त्या सामान्य पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला जातो.

रेगुलर ऑक्युपेशनल थेरपी मध्ये त्यांना एका ठिकाणी शांत बसणे, सूचनांचे पालन करणे, समजूत वाढविणे, फाईन मोटर ॲक्टिव्हिटीज, हात आणि डोळ्यांचा समन्वय साधने, विज्युअल मोटर ॲक्टिव्हिटीज यावर काम केले जाते. या थेरपीज नंतरही मुलांमध्ये जर भाषा विकास झाला नाही तर स्पीच थेरपी देण्यात येते. या सर्व उपचार थेरपी व उत्तम जीवनशैलीच्या समन्वयातून स्वमग्न मुले या फेजमधून बाहेर येऊ शकतात. या मुलांच्या उपचारामध्ये स्वीकार ही पहिली पायरी असून निदान व उपचार व सोबतच योग्य संगोपन देणे गरजेचे आहे.

# शासकीय आयटीआयच्या प्रस्तावित नाव बदलाला विरोध
## श्री संताजी अखिल तेली समाज संघटनेचे निवेदन

■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १ :**
नागपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव श्री संत जगनाडे महाराज बदल करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावित निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करून, ते जसेच्या तसे ठेवण्याची मागणी श्री संताजी अखिल तेली सभा संघटनेने वाडी नगर परिषदचे उपमुख्याधिकारी गौरव गाडगे यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केली.

या संदर्भात, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिल बजाईत म्हणाले की, नागपूर येथील सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव सरकारनेच श्री संत जगनाडे महाराज सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे ठेवले आहे. नाव बदलण्याबाबत कोणत्याही संघटनेने कोणताही निषेध, आंदोलन, विनंती इत्यादी केलेली दिसून येत नाही. असे असूनही व्यावसायिकप्रशिक्षण शिक्षण कार्यालयाच्या पत्र क्रमांक ना ६/नियोजन/ए.पी.संस्था वा त बदल/२०२४/२५/१९३८/दिनांक १८ मार्च



२०२५ द्वारे अलीकडेच जारी केलेल्या परिपत्रकानुसार या नावातील बदलासाठी मते, माहिती, आक्षेप मागवण्यात आले आहेत.श्री संत जगनाडे महाराज हे तेली समाजासाठी तसेच इतरांसाठी एक प्रगतिशील संत मानले जातात.

श्री संत जगनाडे महाराजांनी त्या काळातील जातिव्यवस्थेतील कुप्रथा,कर्मकांड इत्यादींबद्दल जागरूकता निर्माण केली आणि संत तुकाराम महाराजांच्या अभंगाद्वारे जागरूकता मोहीम सुरू केली.

त्यांनी समाजाला शिक्षित आणि जागृत करण्याचे महान कार्य केले. वारकरी संप्रदायाचे संत जगनाडे महाराज यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि परिवर्तनकारी कार्याची दखल घेऊन सरकारने शासकीय आयटीआयला त्यांचे नाव दिले. नागपूर जिल्ह्यात तसेच विदर्भात तेली समुदाय मोठ्या संख्येने आहे.

सरकारच्या या निर्णयाचे समाजानेही स्वागत केले. मग कोणत्याही प्रकारची मागणी किंवा आंदोलन नसतानाही सरकारी आयटीआयचे नाव बदलण्याचा उद्देश काय ? महाराष्ट्रातील संतांच्या पुरोगामी विचारसरणीचा आदर करून, नागपूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था या सरकारी संस्थेचे नाव श्री संत जगनाडे महाराज असे करण्याची मागणी उपमुख्याधिकारी गौरव गाडगे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या निवेदनाद्वारे करण्यात आली. ही विनंती मुख्यमंत्री कार्यालयाला तातडीने पाठवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. याप्रसंगी संघटनेचे पदाधिकारी अनिल बजाईत जिल्हाध्यक्ष अनिल दहागणे सह रोशन वैद्य, उमेश साहू अजय ईखार, विजय मालेवार, देवा क्षीरसागर, सचिन लिचडे, अर्जुन जांभुळकर, चेतन वर्तकर, मोतीरामजी शहारे, संजय जीवनकर, देविदास साठवणे, मनोज भुरे उपस्थित होते.

# किट्सचे सहयोगी प्राध्यापक व कुलसचिव पराग पोकळे सेवानिवृत

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १ :**
किट्सचे सहयोगी प्राध्यापक व कुलसचिव पराग पोकळे कविकुलगुरू इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी अँड सायन्स (किट्स) मधून 31 मार्च 2025 ला सेवानिवृत झाले. त्यानी किट्स मधे भौतिकशास्त्रचे प्राध्यापक, कुलसचिव, सीनियर वार्डन सहित विविध पदावर 37 वर्षे सेवा केली.

त्या निमित्य अप्लाईड सायंस अण्ड हूम्यानीटीज (एएसएच) विभाग व आस्थापना विभाग तर्फे त्यांचा सेवानिवृती वर गौरव करण्यात आला. या निमित्त प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा कार्याचा गौरव करण्यात आला.या वेळी प्रामुख्याने प्रोजेक्ट ऑफीसर आर. श्रीनिवास राव, डॉ. गजानन शर्मा,विभाग प्रमुख,डीन डॉ विलास महात्मे, डॉ. यशवंत जिभकाटे, डॉ. पंकज आष्टणकर, डॉ.सतिष भेले, डॉ. अनंत दाभाडे, डॉ. श्रीकृष्ण चिंचोळकर, डॉ. महेश मावले. प्रा.सव्वासाची, ग्रंथपाल अंजा रेड्डी, प्रशासकीय कार्यालयातर्फे आस्थापना



अधिक्षक राजेंद्रराव, विद्याशाखा अधिक्षक गजानन गुंडुकवार, पीए अंजना, वीणा राणी, सुनीता देवी, कुलभूषण महात्मे, राजेश कारामोरे, राजेन्द्र भीवगड़े, चंद्रशेखर जिभे, प्रशांत फुरसुले, हिमानी चकोले, रामराजू, ओम डडोरे, दिलीप दमाहे, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या सेवानिवृतिवर अनेक प्राध्यापकानी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे म्हणाले की कुलसचिव पराग पोकळे यांच्या कठोर परिश्रम व त्यांच्या सांघिक कामामुळे संस्थेने स्वायत संस्था होण्याचा मान मिळवला.

सत्काराला उत्तर देताना कुलसचिव पराग पोकळे म्हणाले की शिक्षकेतर कर्मचारी संस्थेच्या पाठीच्या कणा आहे. त्यांच्या कार्यावर संस्थेची प्रगति अवलंबून आहे संस्थेच्या प्रगतिवरच कर्मचाऱ्यांची उन्नती आहे. कर्मचाऱ्यांनी संस्थेकरिता कठोर परिश्रम करावे. पुढे ही जवाबदारी आज कनिष्ठ असणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांची आहे. त्यांनी संस्था चालकामध्ये संस्थापक अध्यक्ष श्री राजेश्वर राव ते आजचे सचिव श्री श्रीनिवास राव यांच्या विषयी आभार व्यक्त केले.

## श्रीराम मंदिर बजाज नगर येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा

**नागपूर :** सुमारे १ ८ वर्षांपूर्वी बजाज नगर येथे श्रीरामाचे मंदिर उभारण्याचा मानस व्यक्त केला गेला. मंदिराचे भूमिपूजन आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्रज फडणवीस व आमदार संदीप जोशी यांच्या हस्ते करण्यात आले होते. प्रथमतः छोटेखानी मंदिराची उभारणी करण्यात आली. त्यानंतर या मंदिरातील चांगल्या प्रकारचे बदल बजाज नगरवासीयांनी अनुभवले आहेत. यावर्षी श्रीराम सेवा मंडळाच्या सर्व सदस्यांच्या, भक्तांच्या आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीने श्रीराम मंदिराचा सभामंडप उभा केला गेला. त्याचे अजूनही बरेच काम बाकी आहे. प्रभू रामचंद्र आपल्याकडून सर्व त्रुटी पूर्ण करून घेतील. गुढीपाडव्यापासून तर रामनवमी पर्यंत या मंदिरात दररोज सायंकाळी ७ वाजता गणेश स्तोत्र, रामरक्षा, मारुती स्तोत्र, हनुमान चालीसा याचे पठण केले जाते. या व्यतिरिक्त कार्यक्रमांचे आयोजन देखील केले आहे.

# आदिवासी विकासमंत्री यांचे हस्ते मुख्याध्यापक महेश चौधरी यांचा सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १ :**
मुख्याध्यापक महेश चौधरी यांचा आदिवासी विकास मंत्री यांचे हस्ते सत्कार...माझी शाळा सुंदर शाळा यांत प्रथम.. हिंगणा ..या. ३१... आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन द्वारे वनामती येथे आयोजित कौतुक सोहळा कार्यक्रम नुकताच पार पडला. यांत मुख्याध्यापक महेश चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.

यांप्रसंगी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, पद्मश्री शंकरबाबा पापडकर, अप्पर आयुक्त रवींद्र ठाकरे, प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर, उपायुक्त दिगांबर चव्हाण विभागातील सर्व प्रकल्प अधिकारी उपस्थित होते. आदिवासी समाज व विद्यार्थ्यांच्या



विकासाकरिता उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व अधिकारी वर्ग यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

अनुदानित आदिवासी आश्रमशाळा देवळी पेंढरी या शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमा अंतर्गत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविण्याकरिता विशेष परिश्रम तसेच वार्षिक कामकाजाचा आढावा दर्शक पुस्तिका प्रकाशन व उत्तम शालेय प्रशासन याकरिता शाळेचे मुख्याध्यापक महेश चौधरी यांचा सत्कार आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके, पद्मश्री शंकरबाबा पापडकर तसेच मान्यवर यांचे हस्ते करण्यात आला.

मुख्याध्यापक महेश चौधरी यांनी यशाचे श्रेय शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, व्यवस्थापक मंडळ, प्रकल्प तसेच अप्पर आयुक्त कार्यालय नागपूर येथील सर्व अधिकारी गण, पंचायत समिती हिंगणा येथील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच सर्व केंद्रप्रमुख यांना दिले. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री रमेशचंद्र बंग, सर्व व्यवस्थापक मंडळ, अप्पर आयुक्त तसेच प्रकल्प कार्यालय नागपूर येथील सर्व अधिकारी वर्ग, पंचायत समिती हिंगणा येथील गट शिक्षणाधिकारी व सर्व केंद्रप्रमुख यांनी मुख्याध्यापक महेश चौधरी यांचे पुरस्कार मिळाल्याबद्दल कौतुक केले.

# इतवारी-छिंदवाडा रेल्वे सेक्शनवर ४ एप्रिल पासुन रीवा एक्सप्रेस

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभागांतर्गत नागपूर-छिंदवाडा रेल्वे विभागातील भंडारकुंड येथून भिमलगोंडी विभागात असलेला रेल्वे पूल क्र. ९४ मधील भेगा पडल्यामुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली होती. हे लक्षात घेऊन, या विभागातील रेल्वे वाहतूक तात्पुरती स्थगित करण्यात आली. पूल युद्धपातळीवर पुनर्बांधणीचे काम पूर्ण केल्यानंतर, आता या रेल्वे विभागात रेल्वे वाहतूक सुरू झाली आहे. ते गुळगुळीत केले. प्रवाशांच्या सोयी आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, रेल्वे या प्रकल्पावर जलद गतीने काम करत आहे. ते नियोजित वेळेपूर्वी पूर्ण झाले आहे.

या अंतर्गत, WCR मालकीची ट्रेन क्र. 11756/11755 रेवा- इतवारी-रेवा आता पुनर्संचयित करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल:- ट्रेन क्रमांक ११७५६ रेवा-इतवारी एक्सप्रेस ०१.०४.२५ पासून पण आता ०४/०४/२०२५ पासून आणि विरुद्ध दिशेने जाणारी ट्रेन क्र. ११७५५ इतवारी - रेवा एक्सप्रेस आता ते ०२.०४.२५ ऐवजी ०५/०४/२०२५ पासून लागू होईल. या विभागातील इतर रेल्वे सेवा त्यांच्या नियोजित वेळेनुसार आणि तारखांनुसार धावतील.

## निधन
## अरविंद हांडे

**नागपुरः** अरविंद हांडे यांचं निधन वय 70 महाल संघ बिल्डींग जवळील रहिवासी व पशूसंवर्धन खात्यातील सेवनिवृत्त ए.ओ. अरविंद



हांडे यांचे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७० वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा बुधवारी २ तारखेला सकाळी ९ वा. त्यांच्या राहत्या घरुन निघणार आहे. त्यांच्यावर गंगाबाई घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात मुलगा व दोन मुलीं असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# प्रहारच्या काटोल-नरखेड विधानसभा प्रमुखपदी दिनेश निंबाळकर



■ **महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १ :**
आज कुरळपूर्णा (ता. चांदूर बाजार) येथे झालेल्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय संवाद बैठकीत प्रहारचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री तथा माजी आ. बच्चु कडू यांनी काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख पदी दिनेश निंबाळकर यांची नियुक्ती केली. काटोल तालुका प्रमुखपदी धिरज मांदळे आणि काटोल शहर प्रमुखपदी विजय कठाणे यांची नियुक्ती करीत अभिनंदन केले. याप्रसंगी नागपूर जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) रमेश कारेमोरे, विदर्भ संघटक गजु कुबडे, सदस्य विजय ठाकरे, मनीष देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बच्चु कडू यांनी काटोल नरखेड तालुक्यातील सामान्य माणसांच्या ज्वलंत प्रश्नांना योग्य न्याय दिनेश निंबाळकर हे देतील, असा आशावाद व्यक्त केला. तसेच विधानसभा क्षेत्रातील शेतकरी, कामगार, शेतमजूर आणि दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांनो सोडविणार असल्याचे मत नवनियुक्त विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केलेत.

## शॉर्टसर्किटने मुख्य वीज वाहिनीला आग

**नागपूर :** बजेरिया चौकात रविवारी रात्री शॉर्ट सर्किटमुळे मुख्य वीज वाहिनीला अचानक आग लागली. नागरिकांनी तत्काळ महावितरण आणि अग्निशमन विभागाला माहिती दिल्याने मोठी घटना टळली. मात्र, या घटनेमुळे रात्रभर नागरिकांना त्रास सहन करावा लागला. स्थानिक नागरिक हरीश कुंडले यांच्या माहितीनुसार, रात्री 12.30 च्या सुमारास अचानक वीज तारांमध्ये स्पार्क होऊ लागले. काही क्षणातच दिवाळीतील फटाक्यांसारख्या मोठ्या आवाजासह संपूर्ण केबलला आग लागली. नागरिकांनी त्वरित महावितरण आणि अग्निशमन विभागाला कळविल्यामुळे मोठा अनर्थ टळला, अन्यथा जवळील ट्रान्सफॉर्मरही जळून खाक झाला असता. कुंडले यांनी सांगितले की, सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने वीज वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मुख्य वाहिनीलाच आग लागल्याने नागरिकांना संपूर्ण रात्र उकाळ्याचा त्रास सहन करावा लागला. जवळपास 4-5 तासानंतर वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

# मुद्रांक विक्रेत्यांचा भोंगळ कारभार उघडकीस

■ **महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. १ :**
तालुक्यात अधिकृत मुद्रांक विक्रेता म्हणून जनबंधू असून त्यांनी ग्राहकाला १०० रुपयाचे मुद्रांक असतांना ते नसल्याचे सांगून १०० रुपयाचे मुद्रांक २०० रुपयाला विकल्याच्या तक्रारी बऱ्याच नागरीकांनी केले असून वेळप्रसंगी काहींनी १०० रुपयांच्या मुद्रांका करीता इतर ठिकाणी वणवण भटकावे लागण्याची वेळ आली असून या मुद्रांक विक्रेता जनबंधू यांचा भोंगळ कारभार उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला आहे.

मुद्रांक विकेता एस. के जनबंधू यांनी मार्च महिण्यात भिवापूर उपकोषागार कार्यालयातून दि. ४ मार्चला १०० रुपयाचे २०० मुद्रांक नेले, १२ मार्च - १०० रुपयाचे १०० मुद्रांक, २४ मार्च - १०० रुपयाचे १०० मुद्रांक, २६ मार्चला १०० रुपयाचे २०० मुद्रांक व ५०० रुपये मुद्रांक नेल्याची माहिती उपकोषागार अधिकारी घनश्याम मेंढे यानी प्रतिनिधी शी बोलतांना आज दि. ३१ मार्चला सदरची माहिती दिली. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष अशोक गोंगल यांनी १०० रुपयाच्या मुद्रांक विक्री विषयी होत असलेला गैरप्रकार व नागरीकांना होत असलेल्या त्रासा बदल जातीयतेने तहसिलदार भिवापूर लक्ष देण्याची मागणी त्यांनी केली आहे. यावेळी राजुजी चव्हाण, सुनिल आदमणे, अमित नागोशे उपस्थित होते. तालुक्याच ठिकाण असलेल्या ठिकाणी एकच अधिकृत मुद्रांक विक्रेता असल्याने मोठी अडचण निर्माण होत असून हे महाशय शासकीय कार्यालयीन वेळेत आपली दुकान सुरू करीत नाही. त्यामुळे नागरीक मुद्रांक खरेदीसाठी ताटकळत एकसारखी वाट पाहून त्रासून जाण्याची वेळ येते.

शासकीय लहान व कमी महत्वाच्या कामासाठी १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरची मागणी जास्त असते. त्यामुळे १०० रुपये चा मुद्रांकचा तुटवडा नेहमी पहावयास मिळतो. काहीचे कामे होत नसल्यामुळे या स्टॅम्प पेपर करीता नागरीक पवनी व उमरेडच्या दिशेने धाव घेतात तिथे हे शंभर रूपयाचे स्टॅम्प पेपर उपलब्ध असतात मात्र भिवापूर एकच बोंबाबोब पहावयास मिळत असते.

## महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या १०४ व्या जयंती पर्वावर
# आनंदधाम येथे २१ जोडपे होणार विवाहबद्ध

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १ :**
परमात्मा एक मानवधर्म संस्थापक, महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या १०४ व्या जयंती पर्वावर व्यसनमुक्ती अभियान अंतर्गत परमात्मा एक आनंदधाम रामटेकच्या सौजन्याने निर्मित 'आनंदी सेलिब्रेशन लॉन मध्ये सोळाव्या वर्षीचा सामूहिक विवाह सोहळा कार्यक्रम ३ एप्रिल २०२४ ला होणार आहे. महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती गौरव पुरस्कृत व रामटेक नगर परिषद चे ब्रँड अँबेसिडर लक्ष्मणराव ( बाबुजी) मेहर यांच्या मार्गदर्शनात थाटामाटात पार पडणार आहे. या सामूहिक विवाह सोहळ्यात निराधार २१ जोडपे विवाहबद्ध होणार आहे.

रामटेक येथे आयोजित सामूहिक विवाह सोहळा कार्यक्रमाला राज्यमंत्री तथा रामटेक विधानसभा क्षेत्राचे आमदार अँड. आशिष जयस्वाल, रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार शामकुमार बर्वे,भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार नरेंद्र भोंडेकर,सावनेर विधानसभा क्षेत्राचे





आमदार आशिष देशमुख माजी मंत्री राजेंद्र मुळक,उमरेड चे माजी आमदार राजू पारवे,माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी, पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे, भाजपचे नागपूर जिल्हा महामंत्री उदयसिंग (गज्जू) यादव,जि.प.च्या माजी अध्यक्षा रश्मी बर्वे, नमो नमो मोचार्चे राष्ट्रीय अध्यक्ष विजय हटवार, कृषी उत्पन्न बाजार समिती रामटेकचे सभापती सचिन किरपान, सामाजिक कार्यकर्त्या ज्योतीताई कोल्लेपारा, गोपी कोल्लेपारा, जिल्हा परिषद सदस्य संजय झाडे आदी निमंत्रित पाहुण्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी आनंदधाम परिषरात हळदीचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. दि.३ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता आनंदधाम येथे हवन करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ९ ते ११ या वेळेत रथयात्रा व मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी ११.३० वाजता दीपप्रज्वलन करून संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. बाबांचा सत्कार व चर्चा झाल्यानंतर दुपारी दीड वाजता विवाह सोहळ्याची सांगता होईल.विवाह समारंभाला येणाऱ्या सेवक,सेविका तसेच सगळ्यांसाठी जेवनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# आमची शाळा आणि आमचे शिक्षण वाचवा
## प्राथमिक शाळांच्या विद्यार्थ्यांचे शिक्षणमंत्र्यांना साकडे



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १ :**
शिक्षक निर्धारणानुसार बाबतचा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी आता शिक्षक संघटनांसोबतच विद्यार्थी व पालक सुद्धा पुढे येवू लागले आहे. हा शासन निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने संपुर्ण राज्यभर आंदोलन करण्यात आले होते

आता संपुर्ण राज्यभरातील सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्र्यांना पत्र लिहून " आमची शाळा वाचवा , शिक्षण वाचवा " असे साकडे घातले आहे. १५ मार्च २०२४ च्या राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनेक शाळांमधील इयत्ता ६ वी ते ८ वी चे वर्ग बंद होण्याची शक्यता आहे, एकट्या नागपूर जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे शाळांमधील हे वर्ग बंद होण्याची शक्यता आहे. इयत्ता पहिली ते पाचवी च्या वर्गाला शिकवणा-या शिक्षकांच्या जागा सुद्धा कमी होणार असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होणार आहे, एवढेच काय तर गावातील शाळेतील वर्ग तुटल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार आहे.

त्यामुळेच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शाळा-शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात शिक्षणमंत्र्यांना पत्र पाठवले आहे.

गावातील वर्ग तुटले व शाळा मोडकळीस आल्या तर आमचे शिक्षण सुटेल अशी भिती व्यक्त करत आमच्या शाळांमध्ये पुरेशा प्रमाणात शिक्षक द्या व आमचे शिक्षण वाचवा, अशी मागणी या पत्राच्या माध्यमातून शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४५ प्रकरणांची नोंद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (01) रोजी शोध पथकाने 45 प्रकरणांची नोंद करून रु. 1,92,100/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु.400/- दंड) या अंतर्गत 28 प्रकरणांची नोंद करून रु.11,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून रु. 100/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 04 प्रकरणांची नोंद करून रु.1,600/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद



करणे या अंतर्गत 08 प्रकरणांची नोंद करून रु.17,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

सार्वजनिक रस्ता, फटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे व साठवणे टाकणे या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून रु.1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्यांचा कचर रस्ता, फुटपाथ मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वैद्यकिय व्यवसायकांनी बॉयोमेडीकल वेस्ट सर्वसाधारण कचऱ्यात टाकणे या अंतर्गत 03 प्रकरणांची नोंद करून रु 1,50,000 दंड वसूल करण्यात आला.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 21 प्रकरणांची नोंद करून रु.4,200/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 06 प्रकरणांची नोंद करून रु.6,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मी नगर झोन अंतर्गत मे. जी. पी. कन्स्ट्रक्शन यांनी जुनी इमारत पाडताना खबरदारीचे उपाय न घेतल्याबाबत रु.10,000/- चे दंड वसुल करण्यात आला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. सिद्धी विनायक फर्मासिस्ट, मे. सत्वा सुपर स्पेशाल्टी, व मे. गणेशराव कानफाडे मेमोरीयलज यांनी इटह-1998 नियमानुसार सामान्य कचऱ्यासोबत जैव वैद्यकीय कचरा आढळला टाकल्याबद्दल एकुण रु.1,50,000/- चे दंड वसुल करण्यात आला.

धंतोली नगर झोन अंतर्गत मे. राम गोंडे यांनी प्लास्टिकचा वापर केल्याबद्दल रु.5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. चौरसीया किराणा स्टोअर्स यांनी प्लास्टिकचा वापर केल्याबद्दल रु.5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. उपद्रव शोध पथकाने 06 प्रकरणांची नोंद करून रू. 1,70,000/- दंड वसूल केला.

# कलार समाजाचे युवा नेते अतुल आवलपाने हत्येतील आरोपींना फाशी देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

लोधीखेडा पोलीस स्टेशनचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश सौंसर यांनी आरोपी शिवा, वडील रामजी त्रिपाठी वय 34 वर्ष, रा. पाताळेश्वर अरविंद वडील सुरेश उईके वय 29 वर्ष, रा. गीतांजली कॉलनी, आदित्य उर्फ आसू वडील राजेंद्र कुमार सराठे, वय 29 वर्ष रा. गितांजली, 29 वर्षे, कोठडी सुनावली भारतीय दंड संहितेच्या कलम 120इ आणि 5000 रु. कलम 201 आयपीसी अंतर्गत 05 वर्षे सश्रम कारावास आणि 03 वर्षे सश्रम कारावास आणि 3000 रुपये दंड आणि कलम 302 आणि 120 आयपीसी अंतर्गत आरोपी संदीपला जन्मठेपेची शिक्षा भादवी येथे त्यांना ५ वर्षे सश्रम कारावास आणि ५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.



या खटल्यात सरकारच्या वतीने संदीप मेश्राम, अतिरिक्त सरकारी वकील, सौसर आणि अखितकुमार कुशराम, विशेष सरकारी वकील, सौसर जिल्हा-पदुर्णा यांनी बाजू मांडली.

या घटनेची माहिती देताना अतिरिक्त सरकारी वकील संदीप मेश्राम यांनी सांगितले की, आरोपी शिवा त्रिपाठी हा मयत अतुल आवळापने यांच्याकडे प्रॉपर्टीचा व्यवसाय करायचा आणि काही काळानंतर शिवा त्रिपाठी याने मयत अतुल आवलापने यांच्यासोबत मालमत्ता व्यवसाय सुरू केला तेव्हा मयत अतुल आवळापने अवलापने-शिवा त्रिपाठी यांच्याकडे ३० लाख रुपये परत करण्याची मागणी करत होते, त्यानंतर मयत अतुलला ३० लाख रुपये परत न करण्याच्या उद्देशाने आरोपी शिवा त्रिपाठी याने त्याचे साथीदार आदित्य सराठे, संदीप विश्वकर्मा व अरविंद उडके याने मयत अतुलच्या हत्येचा कट रचला आणि आरोपींसह अतुलला ३०/०८/२०१८ रोजी अटक केली

संदीप विश्वकर्मा आणि अरविंद उडके, कमल ललवाणी यांच्याकडे टोपटा कार क्रमांक एमएच 40 केआर 7313 ची मागणी करण्यात आली आणि या चार आरोपींनी मयत अतुल आवळापने याला सुभाष चौक, नागपूर येथून फूस लावून धोधायबोरगाव ते छितापर दरम्यान जंगलाच्या काठावर नेऊन खून केला. याप्रकरणी लोधीखेडा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास निरीक्षक जी. एस. उईके यांनी केलेल्या तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले असता, आरोपींना न्यायालयाने शिक्षा सुनावली. हा आदेश 12 मार्च2025 रोजी अखिल भारतीय सर्व वर्गीय कलार समाज आणि वडील रमेश अवलपाने (दहरवाल) आणि मामा चिंतरंजन डहरवाल यांनी 7 वर्षे सतत कायदेशीर प्रयत्न केला आणि त्याचे परिणाम म्हणून आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. त्यावेळी पत्रकार परिषदेत अखिल भारतीय सर्व वर्गीय कलार समाजाचे अध्यक्ष भूषण दडवे, उपाध्यक्ष चिंतरंजन डहरवाल, वडील रमेश अवलपाणे (दहरवाल), विजय चौरगडे मिलन रॉय, रमेश जायसवाल उपस्थित होते.

# राजीवनगरची किरण वर्मा न्यायाधीश परीक्षेत राज्यात दहावी

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी ) आणि जेएमएफसी यांनी घेतलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा -2022 चा निकाल घोषीत झाला असून वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या राजीवनगर या वसाहतीमध्ये राहणारी किरण संतप्रसाद वर्मा ही महाराष्ट्रात दहावी आलेली आहे.

स्क्राफ्टचा व्यवसाय करणाऱ्या संतप्रसाद वर्मा यांची मुलगी किरण ही लवकरच न्यायाधीश बनणार आहे.त्यामुळे किरण आणि तिच्या कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे.एकूण 343 उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड झाली.29 मार्चला शनिवारी अंतिम निकाल जाहीर झाला असून 114 जणांची दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदासाठी निवड करण्यात आलेली आहे.

114 उमेदवारामध्ये किरण वर्मा हिने दहावा क्रमांक प्राप्त केला आहे. किरण ही सिव्हिल लाइन, नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर



लॉ-कॉलेज मधुन कायद्याचे शिक्षण पुर्ण केले.नंतर हिने पुण्यातील गणेश सिरसाट ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेतला.

एकदा काही कामानिमीत्त मी आईबाबासोबत न्यायालयात गेले होतो. तेंव्हा तेथील वकीलांना पाहुन माझे बाबा प्रभावित झाले.व माज्याकडे पाहुन म्हणाले की,मै भी मेरी बेटीको ॲडव्होकेट बनाऊंगा. माज्या वडीलांनी फक्त वकील बनवण्याचे स्वप्न पाहीले होते.पण मी आज वकिलांची न्यायाधीश झाले.आणि माज्या वडिलांचे स्वप्न पुर्ण केले.यशाचे श्रेय तिने आईबाबा व ॲड.गणेश सिरसाट यांना दिले, अशी प्रतिक्रिया किरण वर्मा हिने दिली.

किरणला एक भाऊ आणि दोन बहिणी आहेत. दुसऱ्या क्रमांकाची राधिका ही इंजिनियर असून तिसरी रिंकी ही एमपीएससी परीक्षेची तयारी करीत आहे. किरणचा निकाल जाहीर होताच परिसरातील नागरिकांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरु केला आहे. तसेच वानाडोंगरी नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष कृपाशंकर गुप्ता, माजी पंचायत समिती सदस्या रेखा वर्मा, दिलीप गुप्ता, नंदकिशोर वर्मा,ज्योती पारसकर, प्रा.डॉ. सोमेश्वर चोपकर व चंदन वर्मा यांनी घरी जाऊन अभिनंदन केले.

# खडगावात श्री रामकथा व अखंड हरीनाम संकिर्तन सोहळा



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १ :

खडगाव येथील हनुमान मंदीराच्या प्रांगणात श्री रामनवमी उत्सव निमित्य अखंड ज्योत व किर्तन महोत्सव सोहळा निमीत्य रविवार ३० मार्च रोजी सरपंच देवराव कडू ,पुष्पा कडू , ह.भ.प. हर्षल महाराज मांडवगडे, उपसरपंच किशोर सरोदे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीत ह.भ.प. गजानन महाराज चऱ्हाटे यांच्या सुश्राव्य वाणीद्वारे रामधुंद व रामकथेचा प्रारंभ करण्यात आला.

सायंकाळी हरिपाठ, व रात्री ९ वाजता ह.भ.प. गजानन महाराज हिरुळकर (जौनपुर )यांचे किर्तन पार पडले. सोमवार ३१ मार्च रोजी ह.भ.प. अरूण महाराज घोराडे यांचे किर्तन पार पडले.

रविवार ६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प.ईश्वर महाराज उईके (कोंढाळी यांचे श्रीराम जन्माचे किर्तन, सायंकाळी ६ ते १० वाजता पर्यंत भव्य शोभायात्रा व पालखी सोहळ्याचे आयोजन, सोमवार ७ एप्रिल रोजी ह.भ.प. गजानन महाराज चऱ्हाटे यांचे गोपाल काल्याचे किर्तन, सोमवारी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात येईल. आयोजन सार्वजनिक हनुमान धार्मिक सेवा मंडळ यांनी केले आहे.

# नागपूर विभागामध्ये प्रवासी तक्रारींचे त्वरित निवारण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

भारतीय रेल्वे प्रवासी सुविधा आणि सेवा गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी रेलमदत पोर्टलद्वारे अत्याधुनिक तक्रार निवारण प्रणाली चालवत आहे. ही प्रणाली तिकीट, स्वच्छता, सुरक्षा, केटरिंग आणि इतर प्रवासी सेवांशी संबंधित समस्या त्वरित सोडवते, ज्यामुळे रेल्वेच्या कार्यक्षमतेत आणि ग्राहक समाधानात वाढ होत आहे.

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने रेलमदत प्रणाली यशस्वीरित्या राबवली असून, एकूण 38,206 तक्रारी, सूचना आणि मदतीच्या विनंत्या प्रवाशांकडून प्राप्त झाल्या आहेत.

या प्रणालीने सरासरी 22 मिनिटांत तक्रारींचे समाधान आणि 18 मिनिटांत प्राथमिक प्रतिसाद देण्याची कार्यक्षमता मिळवली आहे. प्रवाशांनी या सेवेला उत्कृष्ट रेटिंग दिले असून, सकारात्मक प्रतिसादांमधून हे स्पष्ट होते. तक्रारींचे त्वरित निराकरण झाल्यामुळे प्रवासाचा अनुभव अधिक सुखद झाला आहे.

रेलमदत प्रणालीचा मुख्य उद्देश स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये उच्च स्वच्छता मानके राखणे हा आहे. आतापर्यंत, कोचच्या स्वच्छतेसंदर्भात 1,190 आणि स्थानकाच्या स्वच्छतेशी संबंधित 83 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार, नागपूर विभागाने स्वच्छता उपाय अधिक मजबूत केले असून, स्वच्छ प्लॅटफॉर्म, स्वच्छ शौचालये आणि उत्तम कचरा व्यवस्थापनाची हमी दिली आहे.

भारतीय रेल्वे रेलमदत पोर्टल अधिक प्रभावी करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे, जेणेकरून प्रवाशांच्या तक्रारी अधिक वेगाने सोडवल्या जाव्यात. प्रवासी रेलमदत ॲप, 139 हेल्पलाईन आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे त्यांच्या तक्रारी नोंदवू शकतात. प्रवासी सुरक्षा, स्वच्छता, केटरिंग आणि सेवा सुधारणेला प्राधान्य देऊन रेल्वे प्रवाशांना उत्तम प्रवास अनुभव देण्याच्या दिशेने कार्यरत आहे.

# पिरामिड सिटी येथे झुलेलाल महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

सिंधी समाजातील देव म्हणून पूजले जाणारे श्री झुलेलाल देव यांचा जयंती उत्सव म्हणजे सिंधी समाजाचा नववर्षदिन. सिंधू सभा द्वारा, झुलेलाल पार्क, पिरामिड सिटी, जरीपटका येथे तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. या कार्यक्रमास राजेश बटवानी, सतीश आन्दानी सहित अनेक व्यक्ती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आयोलाल चयो सभी झुलेलाल या घोषवाक्याने प्रेरित होवून पूर्ण सिन्धी समाज या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होता. रात्री १२ नंतर सिंधी नववर्ष च्या शुभेच्छ्या देऊन, जल्लोष साजरा करीत नववर्षाचे स्वागत करण्यात आले होते.

# गणेश शंकर विद्यार्थी बलिदान दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

२५ मार्च १९९२ रोजी भारतीय मजदूर संघाचे निमार्ते दत्तोपंत ठेंगडी यांनी काही विशिष्ट समाजाच्या धर्मगुरूंना घेऊन रेशीमबाग येथे सर्व पंथ समादर मंचाची स्थापना केली होती. विविध धर्मपंथांमध्ये सलोख्याचे वातावरण राहण्याच्या दृष्टिकोनातून दरवर्षी भारतीय मजदूर संघ द्वारा स्थापित सर्व पंथ समादर मंचाच्या वतीने हुतात्मा गणेश शंकर विद्यार्थी बलिदान दिवस साजरा करण्यात येतो. याप्रसंगी भारतीय मजदूर संघाच्या अखिल भारतीय उपाध्यक्ष नीता चौबे यांनी समारोपीय भाषण केले. भामसंघ प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण केले.

सर्वपंथ समादर मंचाचे विदभार्चे प्रमुख प्रशांत रामटेके यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. प्रकाश मोहतकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आभार प्रदर्शन नागपूर जिल्ह्याचे अध्यक्ष शिवराज सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी हुतात्मा गणेश शंकर विद्यार्थी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला वेगवेगळ्या उद्योगातील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता तीर्थराज बडमे, अंकुश भांगे सुनीता शंभरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# निधीश भानसे उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १ :

सोनेगाव ( निपाणी ) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सुजाता भानसे यांचा मुलगा निधीश प्रदीप भानसे यांची अमिरेकत बी. टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (सीएसई)-युनिव्हर्सिटी ऑफ साउथ दाकोटा, (यूएसए ) मध्ये उच्च शिक्षणासाठी निवड झाली झाली.



त्याबद्दल निधीशचे मुख्याध्यापिका निलीमा कामथे, शिक्षक शिक्षक दीपचंद पेंडकांडे, शिक्षीका विनया धात्रक, हर्षा कट्यारमल आदींनी अभिनंदन केले. परिसरात निधीशचे कौतुक होत आहे.

# शक्ति आराधना ही रामरक्षेची फलश्रृती : मीरा कडबे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

श्रीरामरक्षा स्तोत्र हे श्रीरामरुपी पुरुषार्थाने सीताशक्तीच्या साह्याने श्रीहनुमंतासारखा पराक्रम करण्यासाठी आचरणात आणण्याचा सुमार्ग आहे आणि त्यासाठी शक्तीची आराधना आवश्यक आहे असे प्रतिपादन मीरा कडबे यांनी केले. हिंदू रक्षा समिती द्वारा बडकस चौकात आयोजित सामूहिक रामरक्षा पठन कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर समितीचे संयोजक सुनिल काबरा उपस्थित होते. २००६ साली द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी गोळवलकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने प्रारंभ झालेल्या मातृशक्ती जागरणाच्या या अभिनव उपक्रमाचे यंदा अठरावे वर्ष होते. यावेळी बोलताना मीरा कडबे यांनी नुकत्याच महाल भागात घडलेल्या दुर्दैवी घटनांचा आढावा घेत महीला, युवकांनी शक्ति, युक्ती व बलसंपन्न होण्याचे आवाहन केले. येणाऱ्या काळात आसुरी शक्तीचे आव्हान मोठे राहणार असुन ते पेलण्यासाठी आपण सुसज्ज राहायला हवे असेही त्या म्हणाल्या. प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रास्ताविक झाल्यानंतर हजारो महिलांनी सामूहिक रामरक्षा पठन केले. पांडित बच्छराज व्यास चौकातील वातावरण राममय झाले होते. कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महानगर सहकार्यवाह उदय वानखेडे, प्रांत व्यवस्था प्रमुख मोहन अग्निहोत्री, इतवारी भाग संघचालक संजय शिरपूरकर, सुवर्णा गोसावी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# एरीयाने एम.ई.आर.सी.च्या आदेशाचे केले स्वागत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाने येत्या ५ वर्षांच्या नियंत्रण कालावधीसाठी बहु-वर्षीय दर (याचिकेत आपले अंतिम आदेश जारी केले आहेत. सौर ऊर्जा प्रकल्प बसवणाऱ्या ग्राहकांचे हक्क राखणाऱ्या या आदेशाचे AIREA स्वागत करते.


२० किलोवॅटपेक्षा कमी वीज असलेल्या घरगुती ग्राहकांसाठी दिवसाच्या वेळेच्या दराची सक्ती नाही. घरगुती ग्राहकांसाठी बँक केलेल्या विजेसाठी १००% भरपाई (पूर्वीप्रमाणे १० किलोवॅटपेक्षा जास्त वीज असलेल्या १२% बँकिंग शुल्क लागू) व्यावसायिक/औद्योगिक श्रेणीतील ग्राहकांसाठी (२० किलोवॅटच्या मंजूर भारापेक्षा जास्त वीज असलेल्या ग्राहकांसाठी) १७०० तासांपासून मध्यरात्री ०००० तासांपर्यंत वगळता संपूर्ण दिवसासाठी अतिरिक्त बँक केलेली वीज समायोजित करू शकतात. म्हणून, अशा सर्व ग्राहकांना पूर्वीच्या २० तासांऐवजी १७ तासांसाठी वीज भरपाई मिळेल.

घरगुती श्रेणीसाठी सुधारित टेलिस्कोपिक बिलिंग प्रस्ताव मंजूर नाही. ग्रिड सपोर्ट चार्जेस ५००० मेगावॅटपर्यंत संचयी रूफटॉप सोलर इन्स्टॉल बेसपर्यंत पुढे ढकललेग्राहकांसाठी निश्चित शुल्कात कोणताही/किंमत बदल नाही. २० किलोवॅटपेक्षा जास्त वीज असलेल्या अनिवासी ग्राहकांना आता पॉवर फॅक्टर राखावा लागेल, त्यांना आता मध्ये बिल केले जाईल. अशा ग्राहकांच्या बिलांमध्ये अचानक वाढ होईल आणि ही वाढ टाळण्यासाठी त्यांना पॉवर फॅक्टर करेक्शन डिव्हाइस बसवावे लागेल.

AIREA या संतुलित आदेशाबद्दल महाराष्ट्र वीज नियामक आयोग आणि माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानते. या निर्णयामुळे, सौर ऊर्जेचे फायदे अखंडपणे मिळत राहतील आणि येत्या काळात दर कमी होण्याची अपेक्षा आहे. AIREA सार्वजनिक सुनावणी प्रक्रियेदरम्यान जनजागृतीमध्ये योगदान देणाऱ्या माध्यमे, संघटना, सौर इंटिग्रेटर्स आणि व्यक्तींचे आभार मानते, ज्यामुळे अनुकूल सौर धोरण तयार करण्यास मदत झाली.

AIREA ने व्हिडिओंच्या मालिकेद्वारे भागधारकांशी सक्रियपणे संवाद साधला होता, ज्यामध्ये याचिकेचे तपशील आणि टरएळछ चा बचाव स्पष्ट करण्यात आला होता. आमच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील नागरिकांसाठी अनुकूल परिणाम मिळाला आहे याचा आम्हाला आनंद आहे. अक्रऋअ महाराष्ट्रातील नागरिकांना हरित ऊर्जेकडे स्मार्ट स्विच करण्याचे आवाहन करते ज्यामुळे केवळ पैसे वाचतीलच असे नाही तर आकर्षक अनुदाने मिळण्यास आणि प्रदूषण कमी करण्यास मदत होईल. केंद्र आणि राज्याच्या अनुकूल धोरणासह योग्य वेळी सौर क्रांतीमध्ये सामील व्हा अशी माहिती देण्यात आली.

# दक्षिण भारतीय रेल्वे नागपूर विभागाकडून २४-२५ वर्षात लोडिंग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

विभागीय रेल्वे व्यवस्थापक,दीपक कुमार गुप्ता दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभाग यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, विभागाने 2024-25 या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विभागाला 24-25 या वर्षात 18.76 दशलक्ष टन माल लोड करून एकूण 1735.22 कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे, तर गतवर्षी 23-24 मध्ये 15.81 दशलक्ष टन माल लोड करून 1673 कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. 24-25 या आर्थिक वर्षात मागील वर्ष 23-24 च्या तुलनेत शिपमेंटमध्ये 18.66% अधिक आणि उत्पन्नात 3.72% वाढ झाली आहे. या काळात भरलेल्या प्रमुख वस्तूंमध्ये कोळसा, लोखंड, पोलाद, अन्नधान्य, डोलोमाइट आणि मॅंगनीज धातूचा समावेश होतो. मालवाहतूक आकर्षक करण्यासाठी रेल्वेकडून ग्राहकांना विविध सवलती आणि सवलती दिल्या जात असून, त्यामुळे व्यापारी आस्थापनांना मोठा फायदा होत आहे. यासोबतच, मालगाड्यांच्या वेगातही विभागाकडून लक्षणीय वाढ करण्यात आली आहे, ज्यामुळे वाहतुकीची कार्यक्षमता सुधारली आहे आणि सर्व भागधारकांच्या खर्चात बचत झाली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासांतर्गत विभागातील विविध विभागांमध्ये तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाच्या जोडणीचे कामही वेगाने सुरू आहे. असे असतानाही 24-25 या वर्षात प्रवासी वाहतूक आणि माल वाहतूक सुरळीत करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विभागामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व वस्तूंच्या शेडमधील सुविधा आणि व्यवस्था सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत, ज्यामुळे व्यापार आणि औद्योगिक उपक्रमांना चालना मिळेल. रेल्वेचे हे यश देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासोबतच रेल्वे ग्राहकांसाठीही फायदेशीर ठरत आहे.

# २,७७७ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 2,777 वाहन चालकांवर कारवाई करून 1,63,950 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये एक व एनडीपीएस अन्वये एक अशा दोन प्रकरणात 2 आरोपींवर कारवाई अटक करून 19 हजारांचा माल जप्त केला. तसेच जुगार बंदी कायद्यान्वये 5 प्रकरणात 21 आरोपींवर कारवाई करून 1,12,320 रुपयांचा माल ताब्यात घेतला.

# डोळ्यातील जिवंत जंत दुर्मिळ प्रकरणांपैकी एक : डॉ.श्रद्धा वाघमारे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

डॉ. श्रद्धा विजय वाघमारे, इव्हिस्टा आय केअर सेंटरमध्ये काम करणाऱ्या कन्सल्टंट नेत्ररोगतज्ञ यांना आमच्या ओपीडीमध्ये 30 तासांपासून डोकेदुखी आणि उजव्या डोळ्यात लालसरपणा या तक्रारींसह चालत आलेल्या 39 वर्षीय महिला रुग्णाला भेटले. स्लिट लॅम्प तपासणीत उजव्या डोळ्यात एक दणका दिसत होता.

धक्क्याच्या खाली धाग्यासारख्या संरचनेची हालचाल पाहून मला आश्चर्य वाटले. एक गुंडाळलेला जिवंत अळी नेत्रश्लेष्मला खाली फिरताना दिसला. डोळ्यात असे जंत दिसणे अत्यंत दुर्मिळ आहे आणि असे दिसणारे परजीवी शक्य तितक्या लवकर काढून टाकले पाहिजे कारण ते डोळ्यातून बाहेर पडू शकतात आणि शरीराच्या इतर भागात स्थलांतरित होऊ शकतात.

आमचा पेशंट आधी शस्त्रक्रिया करण्यास नाखूष होता पण नंतर मी तिला आणि तिच्या कुटुंबाला हलत्या अळीचा व्हिडिओ दाखविल्यानंतर आणि संभाव्य गुंतागुंत समजावून सांगितल्यावर ती मान्य झाली.



मी आणि इव्हिस्टा आय केअर सेंटरमधील माज्या टीमने एकत्र काम केले आणि नेत्रश्लेष्मला खालून एक ९ सेमी लांबीचा जिवंत जंत बाहेर काढला आणि हिस्टोपॅथॉलॉजीसाठी पाठवण्यात आला ज्याने तो डिरोफिलेरिया असल्याची पुष्टी केली. रुग्णावर स्थानिक अँटीबायोटिक्स आणि सिस्टीमिक अँटीहेल्मिंथिक्सने योग्य उपचार केले गेले आणि ती आता बरी आहे.

ह्युमन ऑक्युलर डायरोफिलेरियासिस हा एक अत्यंत दुर्मिळ आजार आहे जो डिरोफिलेरिया नावाच्या परजीवीमुळे होतो, ज्याला डॉग हार्ट वर्म देखील म्हणतात. हे परजीवी चुकून कुत्र्यांकडून डासांच्या चाव्याव्दारे मानवांमध्ये संक्रमित होतात. ते मानवी शरीरात वाढतात आणि प्रौढ कृमी बनतात आणि त्वचेखाली राहतात.

काहीवेळा, ते डोळे आणि फुफ्फुस यासारख्या इतर अवयवांमध्ये स्थलांतर करू शकतात. डोळे, याला ऑक्युलर डायरोफिलेरियासिस असे म्हणतात जेथे जिवंत जंत नेत्रपटल आणि डोळ्यातील पडदा खाली किंवा आधीच्या चेंबरमध्ये आढळू शकतो. म्हणून, मी याद्वारे, जनतेला अत्यंत सावधगिरी बाळगण्याची आणि डासांपासून सावध राहण्याची विनंती करू इच्छितो कारण मलेरिया आणि डेंग्यू व्यतिरिक्त, डास चावल्याने तुमच्या डोळ्यात जंत येऊ शकतात.

पर्यावरणाची स्वच्छता राखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. डास मारण्यासाठी निवासी भागात नियमित कीटकनाशक फॉगिंग करावे. वैयक्तिक काळजीसाठी, आपण सर्वांनी मच्छरदाणी, मच्छर प्रतिबंधक वापरावे आणि पाणी साचणे टाळावे.

डायरोफिलेरियासिसचा प्रादुर्भाव वाढत असल्याने, असा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी जंतनाशक उपचार केले पाहिजेत. जंतनाशक गोळ्या शरीरात आधीपासून असलेले परजीवी नष्ट करू शकतात अशी माहिती डॉ. श्रद्धा वाघमारे यांनी दिली आहे.

# भोसला सैनिक शाळेमुळे सैन्यदलाला उत्कृष्ट अधिकारी

## देशासाठी शिस्तप्रिय नागरिक घडविण्याचे कार्य : देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

भोसला सैनिकी शाळेच्या माध्यमातून देशाच्या सैन्यदलाला उत्कृष्ट अधिकारी तसेच देशासाठी आधुनिकतेला स्विकारणारी व शिस्तप्रिय नागरिक घडविण्याचे काम होत असल्याचे गौरोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

भोसला सैनिकी शाळेच्या परिसरात संस्थेचे संस्थापक डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे व जनरल बिपीन रावत यांच्या स्मृति प्रित्यर्थ बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक सभागृहाचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.



संस्थापक डॉ. बाळकृष्ण मुंजे यांच्या पुतळ्याचे अनावरण

कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून सेवानिवृत्त सैन्यदलाचे प्रमुख जनरल मनोज पांडे, हवाई दलाचे सेवानिवृत्त एयर चिफ मार्शल शिरीष देव उपस्थित होते. यावेळी व्यासपिठावर सेंट्रल हिंदू मिलिट्री एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुर्यरतन डागा, भोसला सैनिकी शाळेचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर, संस्थेचे कुमार काळे, दिलीप चव्हाण, राहूल दिक्षीत, हेमंत देशपांडे, विवेक रानडे, संजय जोशी, अमरेंद्र हरदास आदी उपस्थित होते.

भोसला सैनिकी शाळा सुरू करतांना समाजामध्ये सैनिकी मुल्यांचे रोपन व सैन्याचे भारतीयकरन व्हावे तसेच त्यांच्यामध्ये लढण्याची क्षमता निर्माण व्हावी यासाठी भोसला सैनिकी शाळेची सुरवात झाली असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, आधुनिकतेला स्विकारणारी पिढी निर्माण करण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून होत आहे. अनुशासित भारत घडविण्याच्या कायासीबतच सैन्यदलाला आधुनिकतेकडे वाटचाल करणारे सैन्यदल प्रमुख मेजर जनरल बिपीन रावत यांच्या स्मृती कायम राहाव्यात व त्यांच्या कायार्ची युवकांना प्रेरणा मिळावी तसेच संपूर्ण भारतीयांना बिपीन रावत यांच्या कायार्ची व आदर्शांची कायम आठवण रहावी, विद्यार्थ्यांमध्ये जिद्द निर्माण व्हावी यासाठी अत्याधुनिक सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. आत्मनिर्भर भारताच्या दृष्टीने देशाची वाटचाल सुरू असून जगातील सर्वात आधुनिक शस्त्र भारतात तयार होत आहे व आपण या शस्त्रांची निर्यात करत आहोत. भारताने नेहमी शांतीसाठी कार्य केले असल्यामूळे बलशाली भारतच जगाला शांतीचा संदेश देवू शकतो असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

एयर मार्शल शिरीष देव यांनी भोसला सैनिकी शाळा ही एनडीए च्या धर्तीवर विकसित होत असून त्यापेक्षाही चांगले सैनिकी शिक्षण येथून विद्यार्थ्यांना मिळत आहे. महाराष्ट्रात सैनिकी शाळांचा शिक्षणाचा दर्जा तसेच सैनिकी शिक्षणाबाबत प्रशासनाकडून विशेष लक्ष पुरविण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

भुतपूर्व सैन्य दल प्रमुख मनोज पांडे यांनी जनरल बिपीन रावत हे देशासाठी अलौकीक कार्य करणारे व विकसीत भारतामध्ये सशस्त्र दलाला आधुनिकतेकडे नेणारे दुरदर्शी नेतृत्व होते. तिन्ही दलाला एकत्र करून त्यांच्यामध्ये समन्वय ठेवण्यासोबतच युद्धासाठी कायम सज्जता असावी अशा प्रगतीशिल विचाराचे असल्यामूळे भारतीय सैन्य दलात त्यांच्यामूळे मोठ्या प्रमाणात सुधारणा झाला असल्याचा गौरोद्गार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

भोसला सैनिकी शाळेचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर यांनी स्वागत करून संस्थेमध्ये जनरल बिपीन रावत यांच्या स्मृतीत कायम राहाव्यात व त्यांच्या कायार्ची विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी अत्याधुनिक अशा सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. सैनिकी शिक्षणाचे सुरूवात करणारे संस्थेचे संस्थापक डॉ. बाळकृष्ण मुंजे यांच्या पुतळ्याचे अनावरण ही संस्थेसाठी महत्वपूर्ण घटना असल्याचे त्यांनी सांगितले. प्रख्यात शिल्पकार प्रदिप शिंदे यांचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन हर्षला राजगिरे यांनी केले. तर राहूल दिक्षीत यांनी आभार मानले. महाराष्ट्र राज्य विद्यूत पारेषण कंपनीच्या सांगिक सामाजिक उत्तरदायित्व योजनेतून तयार करण्यात आलेल्या विकासकामांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

### शहरभरातून डझनभर दुचाकींची चोरी

## अट्टल चोर गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

गणेशपेठ ठाण्यांतर्गत दिवसाढवळ्या घरासमोर उभे दुचाकी वाहन चोरून नेणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखा युनिट 3 च्या पथकाने अटक केली. चौकशीत त्याने शहरभरातून 12 दुचाकी वाहन चोरी केल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीच्या वाहनांसह 9 लाख 60 हजार रुपयांचा माल जप्त केला. सचिन पुंडलिक अतकरी (22) रा. सिद्धेश्वरनगर, मानेवाडा असे अटकेतील चोराचे नाव आहे.

फिर्यादी निखिल अरुण शेंडे (22) रा. इमामवाडा रोड, गुजरवाडी याने गत 27 मार्चच्या दुपारी 12 वाजताच्या सुमारास आपली एमएच-49/ बीडी-0013 क्रमांकाची दुचाकी घरासमोर पार्क केली होती. दुपारी 2.30 वाजता तो बाहेर आला असता दुचाकी गायब होती. आसपास दुचाकीचा शोध घेतल्यानंतर निखिलने गणेशपेठ ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली. गणेशपेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीवर वाहन चोरीचा गुन्हा नोंदविला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट 3 चे पथकही करीत होते.

खबऱ्याकडून मिळालेली माहिती आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीचा सुगावा लागला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याला अटक करून सखोल चौकशी केली असता सचिनने तहसील आणि नंदनवन ठाण्यांतर्गत 2-2 वाहन चोरी केल्याची माहिती दिली. तसेच पाचपावली, लकडगंज, शांतीनगर, सदर, वाठोडा, कळमना आणि धंतोली ठाण्यांतर्गत एक-एक वाहन चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याने दिलेल्या माहितीच्या आधारावर सर्व 12 ही वाहते जप्त केली. पुढील चौकशीसाठी त्याला गणेशपेठ पोलिसांच्या स्वाधिन केले. ही कारवाई पोनि अनिल ताकसांडे, पोउपनि मधुकर काठोके, पोहवा संतोषसिंग ठाकूर, विजय श्रीवास, भूषण भगत, कपिलकुमार तांडेकर, जितेश रेड्डी, दीपक दासरवार, दीपक लाकडे, विशाल रोकडे आणि प्रमोद देशभ्रतार यांनी केली.

# अपघात आणि मृत्यू दरात घट

## मिशन जीवन रक्षा ठरताहे प्रभावी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

शहरात वाढत्या अपघातांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली नववर्षात वाहतूक विभागाने मिशन जीवन रक्षा सुरू केले. या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले आणि त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. 2024 च्या तुलनेत यंदा अपघात आणि मृत्यूदरात घट झाली आहे.

वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त अर्चित चांडक यांनी सांगितले की, शहरातील अपघात रोखण्यासाठी पोलिस आयुक्तांनी काही महत्त्वाचे निर्देश दिले होते. त्यानुसार मिशन जीवन रक्षा सुरू करण्यात आले. या अंतर्गत अपघातप्रवण ठिकाणी रेडियम आणि बॅरिकेड लावण्यात आले, जेणेकरून वेगावर नियंत्रण ठेवता येईल.

शहरातील एक तृतीयांश अपघातांमध्ये पादचाऱ्यांचा मृत्यू होतो. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी फ्रीडम फूटपाथ मोहीम राबवली, ज्या अंतर्गत फूटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यात आले. महिनाभरात 4,500 हून अधिक कारवाई करत अतिक्रमण हटविण्यात आले. जानेवारी ते मार्च 2024 या कालावधीत शहरात 99 अपघात झाले, ज्यात 100 लोकांना प्राण गमवावे लागले होते. मात्र, पोलिसांनी राबविलेल्या उपाययोजनांमुळे यंदा याच कालावधीत अपघातांची संख्या 77 वर आली असून, मृतांची संख्या 81 आहे. पोलिसांचा प्रयत्न आहे की ही संख्या आणखी कमी व्हावी. डीसीपी अर्चित चांडक यांनी सांगितले की, नागरिक वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करतात आणि यामुळेच अपघात होतात. सर्वाधिक मृत्यू डोक्याला गंभीर मार लागल्यामुळे होतात, तरीही नागरिक हेल्मेट घालण्याकडे दुर्लक्ष करतात. ट्रीपल सीट आणि रॅश ड्रायव्हींग करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांना कठोर कारवाई करावी लागत आहे.

**मद्यधुंद वाहन चालकांवर कठोर कारवाई**

मद्यपान करून वाहन चालवणे हे अपघातांचे मुख्य कारण आहे. त्यामुळे रात्री 9 ते पहाटे 2 या वेळेत शहरात 20 ठिकाणी नाकाबंदी केली जात आहे. गेल्या तीन महिन्यांत 447 मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. नियंत्रण आल्याने अपघात कमी झाले आहेत. कापसीतील उमिया धाम कटिंग आणि जामठा टी-पॉइंट येथे वारंवार अपघात होत होते. त्यामुळे या ठिकाणी रंबलर स्ट्रिप, व्हाइट लेनिंग, कॅट आय, हजार्ड मार्कर, ब्लिंकर, अस्थायी सिग्नल बसवण्यात आले. अंधार असलेल्या ठिकाणी महापालिकेच्या मदतीने हायमास्ट दिवे लावण्यात आले. तसेच अपघातप्रवण ठिकाणी वाहन चालकांना जागृत करण्यासाठी वेगमयार्दा आणि इतर सूचनाफलक लावण्यात आले.

## गुंडाने मागितली वृद्धाला खंडणी

**नागपूर :** एका गुंडाने वस्तीतच राहणाऱ्या वृद्धाला दारूसाठी पैशांची मागणी केली. वृद्धाने पैसे देण्यास नकार दिला असता त्यांना शिविगाळ केली. तसेच 10 हजार रुपये मिळाले नाहीतर ठार मारण्याची धमकी दिली. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी सय्यद हुसेन मोहम्मद नकवी (68) रा. सद्भावनानगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपीला अटक केली आहे. अरमान उर्फ इमरान मलिक रऊफ खान (32) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. आरोपी अरमान आणि सय्यद हुसेन हे एकाच वस्तीत राहतात. अरमान हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याच्याविरुद्ध अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. सतत गुन्हेगारीत सक्रीय असल्याने पोलिसांनी त्याच्यावर एमपीडीएही लावला होता. सोमवारी रात्री 8 वाजताच्या सुमारास हुसेन घरासमोर उभे होते. या दरम्यान अरमान तेथे आला. दारू पिण्यासाठी त्याने हुसेन यांना पैसे मागितले. हुसेन यांनी त्याला पैसे देण्यास नकार दिला. यामुडे चिडून अरमानने शिविगाळ करीत त्यांना धमकावण्यास सुरूवात केली. तात्काळ 10 हजार रुपये दिले नाहीतर ठार मारण्याची धमकी दिली.

# आयसोलेशन हॉस्पीटल परिसरात बनणार केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

नागपूर महानगरपालिकेद्वारे आयसोलेशन हॉस्पीटल परिसरामध्ये केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र साकारले जाणार आहे. या प्रस्तावित कायासंदर्भात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मंगळवारी (ता.१) इमामवाडा येथील आयसोलेशन हॉस्पीटल परिसराची पाहणी केली व आवश्यक सूचना नोंदविल्या.

यावेळी उपायुक्त विजय देशमुख, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, धंतोली झोनचे सहायक आयुक्त प्रमोद वानखेडे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता श्रीमती अल्पना पाटणे, अजय पाटील, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, झोनल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शीतल वांदिले, उपअभियंता राजीव गौतम, राजीव गौतम, आयसोलेशन हॉस्पीटलच्या प्रभारी डॉ. मेघा जैतवार, भांडार प्रभारी पृथ्वीसिंग राठोड, आकीर्टेक्ट श्री. त्रिलोक ठाकरे आदी उपस्थित होते.



मनपा आयुक्तांनी केली जागेची पाहणी

मनपा आयुक्तांनी आयोसोलेशल हॉस्पीटल परिसरात प्रस्तावित औषधी साठवणूक केंद्राच्या इमारतीसंदर्भात माहिती जाणून घेतली. येथील १५ हजार वर्ग फुट जागेमध्ये केंद्रीय औषधी साठवणूक केंद्र तयार करण्याचे प्रस्तावित आहे. या केंद्रामधून मनपाचे सर्व रुग्णालय तसेच सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य वर्धिनी केंद्र येथे औषधांचा पुरवठा करण्यात येईल.

सदर प्रस्तावित इमारतीमध्ये महत्वाच्या बैठकीसाठी सभागृह तसेच कार्यालय देखील तयार केले जाणार असल्याची माहिती यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी आयुक्तांना दिली.

यापूर्वी आयुक्तांनी आयसोलेशन हॉस्पीटल ची पाहणी केली. त्यांनी औषध भांडार कक्ष, महिला व पुरुष वार्ड, चाचणी केंद्राला भेट देऊन पाहणी केली. हॉस्पीटलचा संपूर्ण रेकॉर्ड डिजिटल यंत्रणेत अद्ययावत करण्यात येत असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केला.

# जागतिक नवकार महामंत्र दिनाचा भव्य सोहळा




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

जीतो नागपूरच्या वतीने ९ एप्रिल 2025 रोजी कविवर्य सुरेश भट्ट सभागृह, रेशमबाग, नागपूर येथे समस्त जैन समाजासाठी जागतिक नवकार महामंत्र दिनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा पवित्र कार्यक्रम सकाळी ८:०१ ते ९:३६ पर्यंत चालेल.

या महत्त्वाच्या प्रसंगी देशातील प्रमुख व्यक्ती व्हर्च्युअल पद्धतीने सामील होतील पंतप्रधान नरेंद्र मोदी (व्हर्च्युअल सहभाग), गृहमंत्री अमित शहा प्रमुख पाहुणे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपूर जिल्हा, महाराष्ट्र सरकार याशिवाय, अनेक मान्यवर आणि उद्योगपती देखील त्यांच्या मध्ये सहभागी होणार आहेत.

माजी राज्यसभा सदस्य, विजय दर्डा लोकमत मीडिया अध्यक्ष, माजी राज्यसभा सदस्य अजय संचेती, आयएएस अंकुर जैन, सल्लागार मंडळ, खक्कड नागपूर उज्ज्वल पगारिया अध्यक्ष, माजी राष्ट्रीय अध्यक्ष इखर प्रफुल्ल पारीख, नितीन खारा उद्योगपती सुनील रायसोनी - उद्योगपती, प्रदीप कोठारी - उद्योगपती, सीए अनिल पारीख अध्यक्ष, जितो नागपूर, सीमा कोठारी अध्यक्षा, जीतो लेडीज विंग, नागपूर, विजय लुणावत अध्यक्ष, युवा जीतो, नागपूर याशिवाय, साधू-साध्वीजी महाराज साहेबांची पवित्र उपस्थिती देखील या कार्यक्रमाला अधिक आध्यात्मिक आणि पवित्र बनवेल.

या आध्यात्मिक कार्यक्रमाचा उद्देश शांती, सद्भावना आणि विश्व कल्याणाचा संदेश पसरवणे आहे. एकत्रितपणे नवकार महामंत्राचा जप करून आपण सर्वजण सकारात्मक ऊर्जा पसरवू आणि समाजात धार्मिक जाणीव जागृत करू.

आम्ही समाजातील सर्व लोकांना, आध्यात्मिक साधकांना आणि मान्यवरांना या पवित्र प्रसंगी सक्रिय उपस्थिती नोंदवून या ऐतिहासिक क्षणाचा भाग होण्याचे आवाहन करतो.

कविवर्य सुरेश भट्ट सभागृह, रेशीमबाग, नागपूर वेळः सकाळी ८:०१ ते ९:३६ चला, आपण सर्वजण एकत्रितपणे नवकार महामंत्राचा जप करून विश्व कल्याण आणि शांतीचा संदेश पसरवूया. असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले. त्यावेळी उपस्थित माजी खासदार अजय संचेती, अनिल पारख,दिलीप जी रांका, प्रफुल पारख ,सतिश पेंढारी, अतुल कोटेचा,विजय लुनावत, शुभम छुट्टा, राजन ददा, उपस्थित होते.

# अंबाझरी दहनघाट पूल लवकरच पूर्ण होणार

## आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केली पाहणी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

अंबाझरी दहन घाटमध्ये जाणारा पूल तसेच नाग नदीच्या संरक्षण भिंतीचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे.. यासाठी युद्धपातळीवर कामे उरकण्यात यावे, असे निर्देश महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज दिले.

अंबाझरी दहनघाटाकडे नाग नदीवरील पूल जीर्ण झाल्याने तोडण्यात आला आहे. या पुलाच्या बांधकामाचे तसेच संरक्षण भिंतीच्या बांधकामाच्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आज केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता विजय गुरुबक्षानी, स्लम व डीपीडीसीचे कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण, एसडीसी मनोज गद्रे, कनिष्ठ अभियंता किशोर माथूरकर आदी उपस्थित होते.

जवळपास २७ मीटर लांबीचा असलेला हा पूल कमानच्या (आर्च) स्वरुपात राहणार आहे. विशेष म्हणजे सिंगल स्पॅनमध्ये बांधण्यात येत असल्याने नदीच्या पात्रात पिलर राहणार नाही. या पुलामुळे नाग नदीतील पात्रातील पाण्याचा प्रवाह अडणार नाही. त्याचप्रमाणे अंबाझरी तलावाकडून येणाऱ्या नागनदीतील पाणी वस्तीत जाऊ नये, यासाठी नागनदीमध्ये मजबूत संरक्षक भिंत उभारली जात आहे. ही सर्व कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. चौधरी यांनी यावेळी दिले. पावसाळ्यात जनतेला त्रास होणार नाही, या खबरदारी घ्यावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

# कोंबडे चोरीचे वृत्त निराधार

## उमरेड पोलीस निरीक्षकांचा खुलासा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

कोंबडयांच्या झुंजीवर जुगार खेळविल्या जात असतांना पोलिसांनी जप्त केलेल्या 7 कोंबडयांपैकी 3 कोंबडे चोरल्याचे वृत्त पुर्णतः निराधार असल्याचे उमरेड ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी स्पष्ट केले आहे. या संदर्भात दै. महासागरच्या 9 मार्च आणि 1 एप्रिलच्या अंकात वृत्त प्रसिध्द झाले होते.

पोलीस निरीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, उमरेड येथे विनय टॉकिज जवळ कोंबडयांच्या झुंजी सुरु असल्याच्या माहितीवरुन 9 मार्च रोजी धाड टाकण्यात आली होती. त्यावेळी आरोपींकडून पंचांसमक्ष 4 कोंबडे जप्त करण्यात आले.

तथापि, जुगार स्थळी 7 कोंबडे होते व त्यातील 3 कोंबडे पोलिसांनी चोरले, असे वृत्त प्रकाशित झाले होते. त्याचबरोबर कोंबडेचोर पोलिसांची थेट एसपीकडे तक्रार या शिर्षकांतर्गत मंगळवार 1 एप्रिलच्या अंकात वृत्त प्रकाशित झाले. मात्र, या बातमीत तथ्य नसुन, केलेल्या कारवाई बाबत अनिल तांबेकर आणि मनोज मस्ती रा. उमरेड यांच्या तक्रार अर्जावर चौकशी सुरु असल्याचे उमरेडचे पोलीस निरीक्षक यांनी कळविले आहे.

# नागपूरची टँकर मुक्तीच्या दिशेने वाटचाल

## धरमपेठ, नेहरूनगर, हुडकेश्वर-नरसाळा व मंगळवारी झोन टँकरमुक्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

नागपूर शहराला टँकरमुक्त करण्यासाठी महापालिकेतर्फे विविध पावले उचलली जात असून शहरातील धरमपेठ, नेहरूनगर, हुडकेश्वर-नरसाळा व मंगळवारी झोन टँकर मुक्त झाले आहेत. अमृत योजना २ अंतर्गत जलवाहिन्या व फिडर लाईन टाकण्याची कामे येत्या मे महिन्यात पूर्णत्वास जाणार आहे.

अमृत योजनेअंतर्गत नागपूर महापालिकेच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या अधिकृत, अनधिकृत, झोपडपट्ट्यांमध्ये पाणी पुरवठा प्रणालीचे विस्तारीकरण व बळकटीकरण कामांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत ३२ उंच जलकुंभाचे बांधकाम व ३७७ किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी २७ जलकुंभाचे काम पूर्ण झालेले आहे. जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. या योजनेअंतर्गत डबलडेकर जलकुंभाच्या बांधकामाचा समावेश होता. देशात पहिल्यांदा डबल डेकर जलकुंभ कार्यान्वित केला आहे.



महापालिकेच्या हद्दीतील वस्त्यांमध्ये जलवाहिन्या नसलेल्या भागांमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी २०१८ मध्ये ३४६ टँकरची मदत घेतली जात होती. अमृत योजनेअंतर्गत जलवाहिन्या टाकल्यानंतर तसेच नळजोडणी केल्यानंतर २८७ टँकरची संख्या कमी झाली आहे. सध्या केवळ ५९ टँकरने शहरात पाणी पुरवठा केला जात आहे. यापुढे मात्र नागपूर शहराला टँकर मुक्त करण्याचा मानस महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नुकत्याच सादर केलेल्या महापालिकेच्या अर्थसंकल्पात व्यक्त केला आहे.

अमृत योजना २ योजनेअंतर्गत नागपूर महापालिकेच्या अधिकृत, अनधिकृत लेआऊट तसेच स्लम क्षेत्रात वितरण व्यवस्था, फिडर मेन टाकणे व बुस्टर पंप बसविण्याच्या कामांचा समावेश आहे. ययात फिडर मेन लाईन एकूण ४२ किलोमीटर लांबीची आहे. तसेच २८८ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकण्यात येणार आहे. यापैकी २६९ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

# नागपूर महानगरपालिकेचा क्लीन बॅक लेन्स उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

सतरंजीपुरा झोन ०७ विभाग ०५, प्रेम नगर नागपूर महानगरपालिका (एनएमसी), सतरंजीपुरा झोन ०७ ने स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या प्रकल्पांतर्गत, जुने टायर, प्लास्टिकच्या बाटल्या आणि चेंबरच्या झाकण यासारख्या वापरात नसलेल्या वस्तूंचा पुन्हा वापर करून आकर्षक "वेस्ट टू आर्ट वॉल" तयार करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे मागील लेनचे सौंदर्य वाढण्यास मदत झालीच, शिवाय नागरिकांमध्ये स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे हे एक शक्तिशाली माध्यम बनले.

उद्घाटन समारंभ आणि मान्यवर सतरंजयपुरा झोन ०७ चे सहाय्यक आयुक्त धनंजय यादव, झोन अधिकारी वामन कायलकर आणि सर्व विभागीय एसआय अधिकारी, जमादार सर आणि ब्रँड अॅम्बेसेडर अचल वर्मा यांच्या उपस्थितीत या विशेष प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.



या अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि ते शहरी स्वच्छता आणि पुनर्वापराचे एक अनुकरणीय उदाहरण म्हटले. प्रकल्प परिणाम आणि नागरिकांचा सहभाग हा उपक्रम स्थानिक नागरिकांना संदेश देतो की जर टाकाऊ पदार्थांचा योग्य प्रकारे पुनर्वापर केला तर ते निरुपयोगी वस्तू बनण्याऐवजी एक सुंदर कला बनू शकतात. ही स्वच्छ आणि व्यवस्थित देखभाल केलेली मागील लेन स्थानिक रहिवाशांनी सामुदायिक मेळाव्यांसाठी आणि मुलांच्या वाढदिवसाच्या उत्सवासाठी देखील स्वीकारली आहे.

यावेळी बोलताना सहाय्यक आयुक्त धनंजय यादव म्हणाले, "स्वच्छता ही केवळ एक सवय नाही तर एक जबाबदारी आहे. जेव्हा नागरिक आणि प्रशासन एकत्रितपणे काम करतात तेव्हा शहराच्या सौंदर्यात आणि पर्यावरण संरक्षणात प्रभावी बदल शक्य आहे.